सं.फौ.ख.क.१६३/२०१६
सरकार वि. चेतन व इतर
नि.क.७२

**सरकार पक्षा तर्फे साक्षीदार क.१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो/करते की,

माझे नाव : मनोज रमनलाल चौधरी
वय : ३२ वर्षे, व्यवसाय : क्षेत्र सहायक, उमरझरी
राहणार : तिरोडा, जि. गोंदिया

**सर तपास सरकारी अभियोक्ता श्री. मरसकोल्हे यांचे मार्फत :-**

घटना ही दि.१७.५.१५ रोजी कक्ष क.१४३३ तारणा बिट मध्ये सतीघाट तलाव येथे घडली. त्यावेळी मी क्षेत्र सहायक रानबोडी या पदावर कार्यरत होतो. दि.१६.५.१५ रोजी आम्हाला अशी माहिती मिळाली की काही लोक सतीघाट तलाव येथे मासेमारी करण्याकरिता येणार आहे. त्यानंतर माझे सहकर्मचारी एन.आर. मुटकुरे, बीट रक्षक तारणा, डी.बी. आरीकर बीट रक्षक चिकना, जे.आर. धोंगडे बीट रक्षक वानोडा व रविंद्र तितरमारे वन मजुर व मसराम हे सोबत होते. आम्ही रात्री ११:३० चे दरम्यान गस्ती चालू केली. दि.१७.५.१५ रोजी सकाळी १:०० वाजताचे दरम्यान काही इसम सतीघाट तलाव येथे दिसले.

त्यानंतर आम्ही त्यांच्या जवळ गेलो असता त्यांना विचारणा केली की, तुम्ही कसे या सतीघाट तलाव येथे आले. तेथे एकुण चार लोक हजर होते. त्यामध्ये चेतन नागपूरे, अमोल मोहीनकर, सुरज मोहीनकर व महेश मोहीनकर असे होते व त्यांनी आम्हाला मासेमारी करायला आलो असे सांगितले. त्यानंतर आरोपींनी सतीघाट तलावामध्ये टाकलेले जाळे काढले. असे एकुण त्यांच्याकडुन ५१ नग जाळे, ५ रबरी टयुब, दोन मच्छी खारे,

तीन मोटर सायकल वाहन क्र.एमएच ४० सी ६५५१ पॅशन प्लस, स्प्लेंडर प्लस एमएच ४० डब्लू ८५४६, तीसरी गाडी एमएच ४० एस ९६२२ ही जप्त केली. त्यानंतर जप्तीनामा नोंदविला. आता मला जप्ती नामा दाखविला. हा तोच आहे. त्यावर माझी, आरोपीची व पंचांची सही आहे. त्याला **नि.७३** देण्यात येते. आता मला तयार केलेला मौका पंचनामा दाखविला, त्यावर माझी, व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. त्याला **नि.७४** देण्यात येते.

त्यानंतर मुद्देमाल जप्त करून आरोपींना कार्यालय मांढळ येथे आणण्यात आले. त्यानंतर आमचे वरिष्ठ अधिकारी आरएफओ यांना घटनेबाबत कळविले. आरोपींचे बयान वनपरिक्षेत्र अधिकारी एल.ए. आवारे यांच्यासमोर नोंदविले. आरोपीविरूध्द गुन्हा एन.आर. मुटकुरे यांनी नोंदविला. आता मला वनअपराध प्रतिवृत्त दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्याला **नि.७५** देण्यात येते.

गुन्हयात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल मला दाखविला तर मी ओळखू शकतो. आता मला १ ते ५१ जाळे, ५ रबरी टयुब व २ खारे दाखविले. हे तेच आहेत. त्या जाळयांना **आर्टीकल १ ते ५१** देण्यात येते. रबरी टयुब ला **आर्टीकल ५२ ते ५६** देण्यात येते. व खारे यांना **आर्टीकल ५७ व ५८** देण्यात येते. मी आरोपींना ओळखतो व ते न्यायालयात आज हजर आहेत. रानबोडी हे क्षेत्र उमरेड करांडला अभयारण्यातील वनपरिक्षेत्र कुही वन्यजीव, परीमंडळ रानबोडी, बीट तारणा पक्ष क्र.१४३३ येथे आहे.

**<u>उलट तपास आरोपींतर्फे वकील श्री. पिंपळकर यांचेमार्फत:</u>-**

घटनास्थळी महादेवची टेकडी आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो तारणाचा महादेव म्हणून प्रसिध्द आहे. ते मंदीर टेकडीच्या शिखरावर

आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे जाण्याकरिता पाय-या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या टेकडीवर इतरही मंदीर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्या टेकडीवर सतीघाट तलावाचा बांध आहे. हे म्हणणे खरे आहे की,त्या टेकडीला लागून सतीघाट तलाव आहे. हे म्हणणे खरे आहे की, टेकडीसमोरून तारणा उमरेड रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की,त्या रस्त्यावरून एक रस्ता सतीघाट कुटी येथे जातो. हे म्हणणे खरे नाही की, ते रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहे. टेकडीच्या समोर डांबरी रोड आहे. तो रोड ३० फुट रूंदीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रोडने लोक दुचाकी व चारचाकी वाहनाने जात येत असतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्याने लोक महादेवच्या टेकडीवर दर्शनाकरिता जातात. हे म्हणणे खरे आहे की, त्या टेकडीवर महादेवाचे दर्शन करण्याकरिता लोक जातात. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी पक्ष पाहणारे लोक जातात.

हे म्हणणे खरे आहे की, टेकडीवर दर्शनाकरिता जाणा-या लोकांना जंगल विभागाची परवानगी घ्यावी लागत नाही. बांध, तलाव व टेकडी हा एकाच कक्षाचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी टीसीएम (सिमा) लावली आहे. टीसीएम हा १ मीटर उंचीचा व ९० सेंटीमीटर रूंदीचा असतो. मौका पंचनामामध्ये टीसीएम लिहीले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मौका पंचनामामध्ये जंगलाची हद्द कुठून चालू होते, हे लिहीले नाही. स्थळदर्शक नकाशा डव्हारे यांनी केला. मौका पंचनामा करतेवेळी मी नकाशा तयार केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तलावावर आजूबाजूचे लोक त्यांचे गु-यांना पानी पाजतात. टेकडीच्या आजूबाजूला लोकांची शेती आहेत.

आरोपींजवळ मासे नव्हते. आरोपी राजेंद्र मोहीनकर याला मी ओळखू शकतो. मी प्रत्येक व्यक्तीला व्यक्तीशः ओळखू शकत नाही. हे म्हणणे

खरे आहे की, मुद्देमाल जप्त करतांना वनविभागाचे सिल लावावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, जाळयांना सिल लावले नाही. हे म्हणणे खरे आहे की, जप्ती नाम्यावर जे सिल आहे, ते सिल मुद्देमालवर लावावे लागते. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल हा विस्कळीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माल साध्या प्लास्टिकच्या पिशवीत भरला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्लास्टिकच्या पिशवीला सिल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे जप्ती पंचनाम्यातील माल हा मुद्देमाल नाही. हे म्हणणे खरे आहे की, खा-यांचा वापर झाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाळयांचा वापर झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादया जाळीचा वापर केला तर त्याचा रंग बदलतो व त्याला चिखल लागतो. हे म्हणणे खरे आहे की, जप्त करण्यात आलेल्या जाळयाचा रंग बदलला नाही व चिखल लागलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्त करण्यात आलेले जाळे सहजरित्या बाजारात मिळतात. बाजारात कोणत्या प्रकारचे जाळे विकत मिळतात, याबाबत मला माहित नाही.

हे म्हणणे खरे नाही की, गाडया रस्त्यावर होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मौका पंचनामामध्ये गाडया कुठे होत्या, याची नोंद केली नाही. गाडयांची मालक कोण आहेत, याचे दस्त सोबत जोडले नाही.

वनपरिक्षेत्र अधिकारी एल.ए. आवारे यांनी माझे बयान घेतले होते. आता मला माझे बयान दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींनी जाळे तलावामध्ये टाकले होते, याबाबत लिहीले नाही. हे म्हणणे खरे आहे की, टयुबची संख्या, गाडींची संख्या व जाळयांचे वर्णन बयानामध्ये नाही. वरील बाबी माझे बयानामध्ये का लिहीले नाही, याचे कारण मला सांगता येते. कारण की, गाडयांची, जाळयांची व खा-यांची संख्या जास्त असल्यामुळे संख्या लिहीली नाही.

नि.७५ हा दि.१७.५.२०१५ रोजी तयार करण्यात आला. माझे बयानामध्ये प्रथम सुचना रिपोर्ट हा दि.१५.५.२०१५ रोजी घेण्यात आला, असे दर्शविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मौका पंचनामा व बयानात तफावत आहे. बयानावर माझी सही आहे. त्याला **नि.७६** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, जप्त केलेला माल हा मुटकुरे यांना दिला त्याची पोच पावती घेतली नाही. आता मला अभिलेख दाखविण्यात आला तो दस्त क्र.७ आहे. हे म्हणणे खरे नाही की, बयानामध्ये जप्ती व मौका पंचनामा केला याची नोंद नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपी घटनास्थळावर आढळले नाही व त्यांच्याकडुन माल जप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मौका व जप्ती पंचनामा तयार केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मौका व जप्ती पंचनामा खोटा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, नि.७५ हा खोटा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले                    समक्ष

न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड
दि :२०.०८.२०१९